## निशाणी क्र. ८९ वरील आदेश

**०१.** प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेचा आदेश ०१ नियम १० व आदेश ०६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरुस्ती करण्याकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** वादीचे अर्जातील कथन असे आहे की, सदरचा दावा सरसनिरस मानाने वाटप करुन मिळण्याकरीता व मनाई हुकूमाकरीता दाखल केलेला आहे. दावा दाखल केल्यानंतर प्रतिवादी यांना दावा मिळकतींचे हस्तांतर झाल्याबाबत समजले आहे त्यामुळे वादी यांना मिळकती विकत घेणाऱ्या इसमांना दाव्यात समाविष्ट करावयाचे आहे. तसेच दाव्यात या अनुषंगाने नविन मजकुर समाविष्ट करावयाचा आहे. तसेच तथाकथित दस्त बंधनकारक नसल्याने मुद्रांकाबाबत व विनंती कलमात वादी यांना दुरुस्ती करावयाची आहे. म्हणुन वादींचा दुरुस्तीचा अर्ज मंजुर करण्यात यावा अशी वादी विनंती करीत आहे.

**०३.** प्रतिवादींनी या अर्जावर आपले म्हणणे दाखल केले नाही त्यामुळे सदरचा अर्ज प्रतिवादींच्या म्हणण्याशिवाय चालविण्यात आला.

**०४.** वादी यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. माझ्या विचारार्थ निघालेले मुद्दे, त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालीलप्रमाणे नमुद केले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्ज मंजुर करणे योग्य आहे काय ? | होय. |
| २. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**०५.** वादी यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. अर्जातील कथनांचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, दावा मिळकत ही

प्रस्तावित प्रतिवादी यांना विकल्याचे दिसते. या खरेदीखताच्या अनुषंगाने वादींनी प्रतिवादीपणात प्रतिवादी क्र. ६ ते ९ यांचा समावेश करावा व तशी दुरुस्ती करण्याची विनंती न्यायोचित आहे. तसेच वादी यांनी या अर्जात नमुद केल्याप्रमाणे इतर दुरुस्त्या मागितलेल्या आहेत. सदरचा दावा हा वाटपाकरीता व मनाई हुकूमाकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तावित प्रतिवादी यांना दावा मिळकती विकण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे वादीने अर्जात नमुद केल्याप्रमाणे दाव्यात दरुस्ती होणे आवश्यक आहे. वादी व प्रतिवादी यांच्यामधील वादाचे कायमस्वरुपी निराकरण होण्याकरीता वादी यांनी मागणी केलेल्या प्रस्तावित दुरुस्त्या मंजुर करणे आवश्यक आहेत. या दुरुस्तीने प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे अशा परिस्थितीत वादीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणुन मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी विहित मुदतीत दुरुस्ती करावी व दुरुस्त प्रत दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by WABALE RAMDAS DAULAT
Date: 2023.06.06 17:51:25 -0800

खालापूरः (आर.डी.वाबळे)

दि. ०६/०६/२०२३ दिवाणी न्यायाधिश क.स्तर खालापूर

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : M. S. Shirgire, Steno. (L.G.) |
| (b) | Court | : Shri. R. D. Wabale<br>C.J.J.D. & J.M.F.C., Khalapur |
| (c) | Date of Judgment/Order | : 06/06/2023 |
| (d) | Judgment/Order signed by the Presiding Officer on | : 06/06/2023 |
| (e) | Judgment/Order uploaded on | : 06/06/2023 |